| | |
|---|---|
| **PUBLICATION** | Punyanagari |
| **DATE** | August 30th, 2017 |
| **PAGE NO** | 09 |
| **Edition** | Pune |

# लोणावळा चित्रपट महोत्सव एक ते तीन सप्टेंबरला

**पुणे : प्रतिनिधी**

गेल्या वर्षीच्या महोत्सवाला मिळालेल्या प्रतिसादानंतर यंदा चित्रपट रसिकांना लोणावळा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात कलात्मक सिनेमांचा आनंद घेता येणार आहेत. लोणावळ्यामधील आयएनएस शिवाजी रोडवरील त्रिओस प्लाझामध्ये एक ते तीन सप्टेंबर दरम्यान हा चित्रपट महोत्सव होणार आहे.

महोत्सवात चाहत्यांना वेगवेगळ्या प्रकारचे ३२ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चित्रपट दाखविण्यात येणार आहे. आय एम कलाम, अंदाज अपना अपना, जलपरी, द डेझर्ट मरमैड, स्वर्ग, छोटा सिपाही, रसेल मॅडनेस, मंकी अप, द गोल, माय लकी एलिफंट या चित्रपटांचा त्यात समावेश आहे. लोणावळ्यातील अनेक सरकारी, खासगी शाळा व अनाथाश्रमांना या महोत्सवासाठी संपर्क करण्यात आला असून, त्यातील मुलांना याठिकाणी मोफत चित्रपट पाहण्यासाठी पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

गेल्यावर्षी श्याम बेनगल, नसीरुद्दीन शाह, केतन मेहता, गोविंद निहलानी, सुधीर मिश्रा, अनंत महादेवन, दीपा साही, रजत कपूर यांच्यासारखे अनेक मान्यवर कलाकार व चित्रपट निर्मात्यांनी महोत्सवला उपस्थित राहून शोभा वाढविली होती. श्याम बेनगल यांच्या हस्ते गोविंद निहलानी यांचा जीवन गौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला होता. आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजल्या गेलेल्या प्यासा, तमस, अर्धसत्य, द्रोहकाल या चित्रपटांव्यतिरीक्त अनेक शॉर्ट फिल्म व डॉक्युमेंटरी याठिकाणी दाखविल्या गेल्या होत्या.